दै. गोदातीर दि. 02.02.2022

# एमआयडीसीतील मेधावी कंपनीत चोरी करणाऱ्या ५ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेकडून मुद्देमालासह अटक



**नांदेड –** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी भागात असलेल्या मेधावी कंपनीत चोरी करणाऱ्या ५ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

जिल्ह्यातील विविध प्रकरणातील गुन्हेगारांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलीस निरीक्षकांना आदेशीत केल्यानुसार त्यांनी अधिकारी व अमलदार यांची पथके तयार करून मालाविषयीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक केली आहे.

१ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी नांदेड येथील मेधावी कंपनीतील सिमेंटचे पाईप बनवणाऱ्या रिंगची चोरी करणाऱ्या इसमाबाबत खात्रीशीर माहिती पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना मिळाल्याने त्यांनी एक पथक तयार करून आरोपींना ताब्यात घेण्याचे कळविले. त्यानुसार स्थागुशाच्या पथकाने गोपाळचावडी, सिडको नांदेड येथील ऋषीप्रसाद विजय जाधव (वय २० वर्षे) व्यवसाय टेम्पोचालक यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने व त्याचे मित्र नामे जितेश बाबाराव वानखेडे (वय २२ वर्षे) रा. रुबी हॉटेलजवळ एमआयडीसी नांदेड, कृष्णा शिवकुमार पईतवार (वय २३ वर्षे) रा. गुरुवार बाजार सिडको नांदेड, वैभव ऊर्फ विक्की अनिल नरवाडे (वय २३ वर्षे) रा. दीक्षानगर नांदेड व इतर एक त्यांनी मिळवून दि. २९ जानेवारी रोजी रात्री एमआयडीसीतील मेधावी कंपनीतील सिमेंट पाईपच्या लोंखडी रिंगची चोरी करून देगलूर नाका येथील एका भंगार दुकानात विक्री केली असे सांगितले. त्यावरून स्थागुशाच्या पथकाने चोरी केलेले लोखंडी ६ रिंग किंमती ३६ हजार, गुन्ह्यात वापरलेला टेम्पो किंमत दीड लाख, मोटारसायकल किंमत ३० हजार असा एकूण दोन लाख १६ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. सदरचा माल व आरोपींना पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, निलेश मोरे अपर पोलीस अधीक्षक, विजय कबाडे अपर पोलीस अधीक्षक भोकर, व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि डी. काळे, पोहेकॉ/गंगाधर कदम, पोना/बालाजी तेलंग, विठ्ठल शेळके, पोकॉ विलास कदम, गणेश धुमाळ, चालक अर्जुन शिंदे यांनी पार पाडली.

दै. गोदातीर दि. 02.02.2022

# स्थानिक गुन्हे शाखेने काळ्या बाजारात जाणारा गहू व तांदूळ पकडला

## नऊ लाख चौसष्ट हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

**शंकरनगर–** नरसी ता. नायगाव येथील बालाजी मंदिरासमोर देगलूर रोडवर दोन अयचरमध्ये काळ्या बाजारात जाणारा तांदूळ व गव्हाने भरलेला टेम्पो स्थानिक गुन्हे शाखेने १ फेब्रुवारी रोजी दुपारी पकडला.

याबाबत माहिती अशी की, काळ्या बाजारात जाणारा गहू व तांदळाने भरलेला एम.एच. २६. बि.ई.६८०६ व एम.एच.२६ ए.डी. २०८२ क्रमांक असलेल्या आयचर टेंपो मध्ये गहू व तांदळाचे एकूण १९० पोते ज्याची किंमत १ लाख ४८ हजार असुन एकूण नऊ लाख चौसष्ट हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून सदर गाड्या रामतीर्थ पोलिसात लावण्या आहेत. पुढील कारवाईसाठी महसुल प्रशासन नायगाव यांना कळविण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेतील ए.एस.आय. जे. एच.शाहू, पो.ना.कांबळे, पो.ना.पोतदार, पो.कॉ.यादगीरवाड चालक बिचकेवाड यांनी कारवाई केली आहे.

